

गाडी नंबर 1760 चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

शनिवार दिनांक 21/06/२०२५

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 137 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# उद्धव ठाकरेंची मुंबईत मोठी ताकद-शरद पवार



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

उद्धव ठाकरे यांची मुंबईत मोठी ताकद, त्यांना विश्वासात घेऊन निवडणुकीला सामोरे जावे लागेल असे शरद पवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना बारामती येथे सांगितले.

आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये मुंबई काबीज करण्यासाठी भाजप, शिवसेना व अजित पवार यांची राष्ट्रवादी एकत्र लढणार की वेगवेगळे हे अजून स्पष्ट झालेले नाही. भाजपने मुंबई काबीज करण्यासाठी कंबर कसली आहे. शिंदे यांच्या शिवसेनेसोबत तसेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी बरोबर भाजप मुंबई महानगरपालिका जिंकणार असल्याचे त्यांच्या पक्षाच्या वतीने अनेक वेळा सांगण्यात आले. परंतु मुंबईत आज पर्यंत ठाकरे यांच्या नावाचे वलय राहिले आहे .तसेच मुंबई महानगरपालिकेवर शिवसेनेचाच झेंडा दरवेळी फडकला आहे . मागच्या महानगरपालिका निवडणुकीतही भाजप विरुद्ध शिवसेना अशी लढत झाली असताना शिवसेनेने बाजी मारत मुंबई महानगरपालिका स्वतःकडे ठेवण्यास यश संपादन केले होते. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही शिवसेनेचे दोन शिवसेना झाले आहे तसेच त्या शिवसेनेच्या बरोबरीने ने देशातील सर्वात मोठा पक्ष भाजप आहे आणि भाजपला मुंबई महानगरपालिका जिंकायची आहे, त्यासाठी प्रयत्न सुरू आहे.

परंतु मुंबई महानगरपालिका व मुंबई शहरावर नेहमीच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची मोठी ताकद राहिली आहे व ती आजही कायम आहे असे शरद पवार यांच्या वक्तव्यावरून समजते. त्यामुळे आता मुंबई महानगरपालिका निवडणुकी करिता महाविकास आघाडी चर्चा करणार असून उद्धव ठाकरे यांना विश्वासात घेऊन पुढील महानगरपालिका निवडणूक कशी लढवायची याबाबत व्युहरचना करणार असल्याचे संकेत शरद पवार यांनी आज बारामती येथे दिले आहे.

दोन्ही ठाकरे बंधू कधी एकत्र येणार हे अजूनही अस्पष्ट आहे. त्यामुळे आता उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना महाविकास आघाडी सोबत जाते की मनसेच्या सोबत युती करते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# विधानभवनमध्ये 23, 24 जून रोजी संसद

## आणि राज्यांच्या अंदाज समित्यांची राष्ट्रीय परिषद



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषद मुंबईत होणा असून महाराष्ट्र विधानभवन येथे २३ व २४ जून, २०२५ रोजी या दोन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेला लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश सिंह, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, लोकसभेच्या अंदाज समितीचे समिती प्रमुख डॉ. संजय जयस्वाल, महाराष्ट्र विधानमंडळाच्या अंदाज समितीचे समिती प्रमुख अर्जुन खोतकर उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या समारोपानंतर दिनांक २४ जून, २०२५ रोजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची पत्रकार परिषद होईल.

या राष्ट्रीय परिषदेमध्ये “प्रशासनीक कार्ये सक्षमपणे आणि अल्पव्ययासह होतील याची सुनिश्चिती करण्यासाठी अर्थसंकल्पीय अंदाजांचे पुनर्विलोकन आणि प्रभावी नियंत्रण यासाठी अंदाज समितीची भूमिका” या विषयावर विचारमंथन होईल.

या दोन दिवसीय परिषदेमध्ये संसद, सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाज समित्यांचे समिती प्रमुख आणि सदस्य सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य आणि महाराष्ट्रातील संसद सदस्य देखील या परिषदेस उपस्थित राहणार आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शनिवार दिनांक 21/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे भक्तीभावात स्वागत!

## टाळ-मृदंग अन् हरीनामाचा गजर : आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने सेवा उपक्रम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी-चिंचवड : श्रीक्षेत्र देवाची आळंदी येथून प्रस्थान केलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारी पायी पालखी सोहळ्याचे मॅगझिन चौक, भोसरी येथे उत्साहात स्वागत करण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्या वतीने आयोजित केलेल्या या स्वागत सोहळ्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला.

टाळ-मृदंगाचा गजर आणि हरीनामाचा जयघोष करीत पालखी सोहळा उद्योगनगरीमध्ये दाखल झाला. वारकऱ्यांना पावसापासून संरक्षण मिळावे म्हणून छत्र्या, रेनकोटचे वाटप, तसेच पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, केळी, फराळ व लाडूंचे वितरण करण्यात आले. याशिवाय हेल्थ चेकअप कॅम्प व वैद्यकीय सेवा सुद्धा उपलब्ध करून देण्यात आल्या.

दरम्यान, पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, पोलीस विभाग, स्वयंसेवी संस्था व सामाजिक कार्यकर्ते यांचे सुद्धा नियोजन चोख होते. स्थानिक आमदार म्हणून महेश लांडगे यांनी प्रतिवर्षीप्रमाणे सेवा देण्याची भूमिका घेतल्याने उपस्थित भाविकांमध्ये समाधान आणि आनंदाची भावना दिसून आली. सदर स्वागत सोहळ्यास विधान परिषदेच्या आमदार चित्रा वाघ सुद्धा उपस्थित होत्या. त्यांनीही वारकरी भगिनींसोबत फुगडीचा फेर धरला. वारीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड शहरात भक्तीभाव, सेवाभाव आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

संत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या आणि पंढरीची वारी म्हणजे महाराष्ट्राचं सांस्कृतिक वैभव आहे. नव्हे ती महाराष्ट्राची ओळख आहे. सामाजिक एकोपा, बंधुभाव शिकविणाऱ्या या पालखी सोहळ्याला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. हा इतिहास संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक श्रीधरबुवा देहूकर आणि त्यांचे चिरंजीव डॉ. सदानंद मोरे यांनी लिहून ठेवला आहे. या संतविचारांनी प्रेरीत होवून आम्ही टाळगाव चिखली येथे भारतातील पाहिले जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतीपीठ उभारण्याचा संकल्प केला. संतकृपेने हे ज्ञानमंदिर उभा राहिले आज या ठिकाणी 1600 हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. वारीत सहभागी झाल्यानंतर अध्यात्म आणि आधुनिक शिक्षणासाठी केलेल्या कार्याचे मनोमन समाधन वाटले, अशा भावना आमदार लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.

“वारी ही केवळ परंपरा नाही, ती आपल्या श्रद्धेचा आणि संस्कृतीचा आत्मा आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने लाखो वारकरी आपल्या पवित्र भावनेनिशी निघालेले असतात. अशा वारकरी भक्तांची सेवा करता आली, तर तो माझ्यासाठी सन्मानच आहे. वारकरी हेच खरे विठ्ठल, त्यांची सेवा म्हणजेच खरी वारी अशी आमची भावना आहे. पिंपरी-चिंचवड शहरातून संत तुकोबा आणि संत ज्ञानोबा यांची पालखी मार्गस्थ होत असताना त्यांना कोणतीही अडचण होऊ नये, म्हणून आम्ही नियोजनपूर्वक सेवा उपक्रम राबवले. ही आपली जबाबदारीच आहे. संत परंपरेचा आणि वारकऱ्यांच्या भक्तीचा हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे, हे आपले सामूहिक कर्तव्य आहे."

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# सासरच्या छळाला कंटाळून महिलेची आत्महत्या ; पतीला अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




सासरच्या छळाला कंटाळून एका महिलेने आपल्या सहा वर्षाच्या मुलासह इमारतीतून उडी मारून आत्महत्या केल्याची घटना बुधवार (दि. १८) जून रोजी कात्रज भागातील आंबेगाव भागात घडली. या घटनेनंतर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी महिलेचा पती शशिकांत देशमुख याला पोलिसांनी अटक केली आहे. मयुरी शशिकांत देशमुख व सहा वर्षाचा मुलगा विष्णू शशिकांत देशमुख अशी या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या आई मुलाची नावे आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयुरी शशिकांत देशमुख या बालवाडी शिक्षिका होत्या. त्यांचे पती शशिकांत हे एका बँकेत नोकरी करत आहेत. बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास मयुरीने सहा वर्षाचा मुलगा विष्णू याच्यासह पाचव्या मजल्यावरून उडी मारली, त्यावेळी मयुरीचे पती घरात नव्हते. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मयुरी व सहा वर्षाचा मुलगा विष्णू या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. आत्महत्या करण्यापूर्वी मयुरीने चिठ्ठी लिहून ठेवली होती. यामध्ये सासरच्यांकडून सतत शिवीगाळ ,मारहाण व दमदाटी होत असल्याने आपण आत्महत्या करत असल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे आत्महत्येस प्रवृत्ती केल्या प्रकरणी मयुरीच्या पतीला अटक करण्यात आली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शनिवार दिनांक 21/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# प्रदीप आहेर समता परिषदेचे शहराध्यक्ष

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद पिंपरी चिंचवड शहराच्या शहराध्यक्षपदी प्रदीप आहेर यांची नियुक्ती करण्यात आली. सदर नियुक्तीचे पत्र छगन भुजबळ यांच्या हस्ते प्रदीप आहेर यांना देण्यात आले.नामदार छगन भुजबळ हे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. पिंपरी चिंचवड शहरात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे कार्य वाढविण्यासाठी तसेच पिंपरी चिंचवड शहरात समता परिषदेच्या माहितीचा विस्तार करण्यासाठी प्रदीप आहेर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.प्रदीप आहेर हे अनेक सामाजिक संस्थांवर कार्यरत आहे. चिखली दीपक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित संस्थेवर चेअरमन म्हणून ते सध्या कार्यरत असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर उपाध्यक्ष आहेत तसेच विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे.त्यांनी आपल्या सामाजिक कामाने पिंपरी चिंचवड शहरात अनेक घटकातील कुटुंबांना मदत केली आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरातील विकास कामात प्रदीप आहेर यांचा मोलाचा वाटा आहे, त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेत त्यांना अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या पिंपरी चिंचवड शहराच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीनंतर सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

तसेच नियुक्ती झाल्यानंतर प्रदीप आहेर यांनी छगन भुजबळ व समता परिषदेचे कार्याध्यक्ष बापू भुजबळ यांचे आभार व्यक्त केले.

# मनपा वतीने पालखीचे स्वागत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी : टाळ मृदूंगाच्या लयीत ज्ञानोबा तुकारामाचा गजर करीत पंढरीकडे निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज

यांच्या पालखी सोहळ्याचे पिंपरी चिंचवड शहरात दिमाखात आगमन झाले. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पालखीचे स्वागत केले.

आषाढीवारी पालखी सोहळ्यानिमित्त आळंदीहून पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे पिंपरी चिंचवड शहरात भोसरी फाटा, दिघी येथील मॅगझिन चौकात आगमन झाले. यानिमित्ताने पालिकेच्या वतीने मॅगझीन चौक येथे स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. या ठिकाणी आयुक्त शेखर सिंह यांच्यासह पिंपरी चिंचवड महापालिकेचे अधिकाऱ्यांनी टाळ मृदुंगाच्या तालावर ठेका धरत आनंद साजरा केला.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, उप आयुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, सचिन पवार, सिताराम बहुरे, सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, नाना मोरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्याधिकारी राजेश भाट, संतपिठाचे विश्वस्त राजू महाराज ढोरे तसेच विविध विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

स्वागत कक्षामध्ये आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते मानाच्या दिंड्यांना प्रथमोपचार पेटी, देशी वृक्षांच्या बिया, तुळशीचे रोप, संपर्क माहिती पुस्तिका आणि कापडी पिशवी देऊन सन्मान करण्यात आला.

मॅगझिन चौक येथे भाविकांनी तसेच नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यावर्षीही उद्यान व वृक्षसंवर्धन विभागाच्या वतीने पालखी स्वागताच्या ठिकाणी आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आलेली होती, याठिकाणी छायाचित्रे काढण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

दरम्यान, आषाढीवारी निमित्त वृक्षारोपण, हरीतवारी असे विविध उपक्रम देखील महापालिकेच्या वतीने राबविण्यात आले आहेत. स्वागताच्या ठिकाणी महापालिकेच्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी अभंग गायनाचा कार्यक्रम सादर केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शनिवार दिनांक 21/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# गाडी नंबर 1760 चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मराठी चित्रपटसृष्टीत थ्रिलर, रहस्य आणि विनोदी यांचा मिलाफ असणाऱ्या काही निवडक चित्रपटांमध्ये लवकरच आणखी एका दमदार चित्रपटाची भर पडणार आहे, ती म्हणजे 'गाडी नंबर १७६०'ची. तन्वी फिल्म्स प्रस्तुत आणि योगीराज संजय गायकवाड दिग्दर्शित या आगामी चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला असून, रहस्य आणि विनोदाने भरलेला हा ट्रेलर सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.




ट्रेलरमध्ये दिसतेय, की प्रत्येकजण पैशांनी भरलेल्या एका काळ्या बॅगेच्या मागे लागलेला आहे. ही बॅग कुणाची आहे? तिच्यामध्ये काय दडलं आहे? आणि 'गाडी नंबर १७६०' चं या सगळ्याशी काय संबंध आहे? हे सगळं एक अनोखं रहस्य आहे, जे ४ जुलैला चित्रपटगृहात उलगडणार आहे. दरम्यान चित्रपटातील वातावरण हलकं-फुलकं असलं तरी, त्यामागे एक खोल आणि विचार करायला लावणारं कथानक आहे. प्रेक्षकांना खळखळून हसवतानाच, एक मोठं रहस्य शेवटपर्यंत उलगडत जाणार आहे आणि ही या चित्रपटाची खासियत ठरणार आहे.

चित्रपटाबद्दल दिग्दर्शक योगीराज संजय गायकवाड म्हणतात, "हा चित्रपट म्हणजे केवळ एक रहस्यमयी कथा नाही, तर मानवी लालसेचा आणि गोंधळलेल्या नैतिकतेचा एक आरसा आहे. प्रत्येक पात्र बॅगेच्या मागे का लागले आहे, यामागील कारणे वेगवेगळी असली तरी त्यांची उद्दिष्टं एकसारखीच आहेत ती म्हणजे पैसा. प्रेक्षकांना वेगळा अनुभव देण्यासाठी आम्ही कथानकाला थोडे हटके वळण दिले आहे.

या प्रत्येक वळणावर प्रेक्षकांची उत्कंठा वाढणार आहे."

निर्माते कैलाश सोराडी म्हणतात, " तन्वी फिल्म्सच्या वतीने आम्ही प्रेक्षकांसमोर नेहमीच दर्जेदार आणि हटके कथा घेऊन येण्यासाठी प्रयत्नशील आहोत. 'गाडी नंबर १७६०' हा त्याच प्रयत्नाचा एक भाग आहे.

हा चित्रपट मनोरंजनाबरोबरच एक सशक्त कथा घेऊन आला आहे. प्रेक्षकांच्या मनात प्रश्न निर्माण करून त्यांना शेवटपर्यंत खुर्चीत खिळवून ठेवण्याची ताकद या चित्रपटात आहे. सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आवडेल असा हा चित्रपट आहे."

तन्वी फिल्म्स प्रस्तुत या चित्रपटाचे निर्माते कैलाश सोराडी आणि विमला सोराडी आहेत, तर लेखन योगीराज संजय गायकवाड यांनी केले आहे. चित्रपटात मराठी सिनेसृष्टीतील प्रथमेश परब, शुभंकर तावडे, प्रियदर्शिनी इंदलकर, सुहास जोशी, प्रसाद खांडेकर, श्रीकांत यादव आणि शशांक शेंडे यांसारख्या दमदार कलाकारांचा सहभाग आहे.

# वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

दरवर्षीप्रमाणे श्री संत तुकाराम महाराज पालखीतील वारकऱ्यांसाठी गुरुवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत श्रीकृष्ण मंदिर निगडी जवळ संस्कार प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.



त्या शिबिरात सर्दी खोकला ताप थंडी अंगदुखी पाठ दुखी मान दुखी इत्यादींची तपासणी करून मोफत औषधांचे वाटप केले तसेच वारकऱ्यांच्या पायांची मसाज करण्यात आली. या तपासणीसाठी पिंपरी चिंचवड शहरातील विविध विषयातील तज्ञ डॉक्टर आले होते या शिबिराचे उद्घाटन लाइफ पॉईंट हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ राकेश नेवे डॉ सुधीर भालेराव टाटा मोटर्सचे डॉ प्रकाश साखळकर डॉ शरदचंद्र जगमवार यांच्या. आय एम ए चे अध्यक्ष डॉ. ललित कुमार धोका सचिव: डॉ. मिलिंद सोनवणे हस्ते करण्यात आले.या शिबिरात प्रथमच तंबाखू आणि सिगारेट याचे स्क्रिनिंग करण्यात आले आणि त्याचे दुष्परिणाम काय याच्याविषयी लाईफ पॉईंट हॉस्पिटलच्या वतीने वारकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

वारकऱ्यांच्या तपासणीसाठी डॉ मृणाल फोडेकर डॉ नीरजकुमार पाटील डॉक्टर सेजल खीवसरा डॉ अनुजा चोपडा डॉ सुलोचना राठोड डॉ विजय भळगट डॉ संजय साळवे डॉ मृदुला स्वामी.डॉ प्राची हेंद्रे संजय साळवे डॉ आरोही जाधव कनिष्का भन्साळी डॉ. अनिकेत नलगे यांनी तपासणी केली. या शिबिरात प्रथमच आयएमएचा सहभाग होता तसेच ताम्हाणे हॉस्पिटल चिंचवड भालेराव हॉस्पिटल आकुर्डी यांनी सहकार्य केले. या शिबिरासाठी लक्ष्मी मेडिकल चिंचवड सप्तश्रृंगी मेडिकल काळेवाडी राहुल मेडिकल प्राधिकरण श्री मनोज शिंदे आणि श्री मोहन पटाधारी यांनी औषधांसाठी मदत केली.

या शिबिराचे संयोजन संस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ मोहन गायकवाड संध्या स्वामी सायली सुर्वे अनुषा पै पल्लवी नायक अरुण कळंबे ओम पाथरे निलेश मस्के रमेश बामणे विजय आगम मनीषा आगम आनंद पाथरे राजेंद्र फडतरे सुनंदा निकरड मनोहर कड सुधाकर खुडे विनोद सुर्वे शिवाजी पाटील सिद्धी ढेरे स्तुती सोमवंशी सायली यादव भक्ति सरडेअंजली प्रधान महावीर कदापुरे अनिल हूलावले यांनी केले होते

या शिबिरानंतर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसोबत भक्ती शक्ती ते पवळे उड्डाणपूल पर्यंत स्वच्छता अभियान करण्यात आले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968